स्वातंत्र्याचा
अमृत महोत्सव



श्री. सचिन हिरालाल कदम
एम. ए. बी.एड.

# इतिहासातील अभ्यासक्रम अपुरेपणा व परिणाम

*परिचय : २०११ ते २०१५ या कालावधीत आकाशवाणी मुंबई केंद्रात डीटीएच माय मराठी या वाहिनीसाठी उद्घोषक (RJ) म्हणून काम केले. २०२१ मध्ये 'राष्ट्रीय समाज रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.*

काही दिवसांपूर्वी मला पनवेलमधील शिवाजी चौकात जाण्याचा योग आला, तेव्हा त्या चौकात **अखंड भारत व्यासपीठाचा** बॅनर लावलेला पाहिला. उत्सुकता म्हणून मी त्या बॅनरकडे पाहिले असता त्यात मला आपला भारत अफगाणिस्तान ते थायलंडपर्यंत असलेला दिसला. मी इतिहास आणि संस्कृत विषयांचा शिक्षक असल्याने मला त्या नकाशामध्ये आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते. उलट तिकडच्या एका तरुण मुलाने अखंड भारताचा नकाशा पाहून जी प्रतिक्रिया दिली, त्याचे मला जास्त आश्चर्य वाटले. खरं तर त्या मुलाची प्रतिक्रिया रास्त होती. कारण आपण आपल्या मुलांना भारताचा पूर्ण इतिहास कधी समजावून सांगितलाच नाही. आपल्या शाळांमध्ये इतिहास विषय शिकवला जातो, पण त्यात आपला भारत अफगाणिस्तान ते थायलंड होता, त्याचे तुकडे कसे पडले? हा भाग कधीच शिकवला गेला नाही. पाठ्यपुस्तकात असलेल्या अपुऱ्या माहितीमुळे आज आपल्या डोळ्यांसमोर असलेला भारतच त्यांना माहीत आहे. त्यामुळे या तरुण पिढीला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. आपणच त्यांना अपुरा इतिहास सांगितला, त्यामुळे त्यांचे इतिहासाचे ज्ञान तोकडे पडले हे नाकारून चालणार नाही.

आपल्याकडील विद्यार्थ्यांना इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात जगातील विविध संस्कृतींचा अभ्यास आहे, पण आपल्याकडे मोहंजदाडो, हडप्पा संस्कृती विषयीचा भाग थोडक्यात आटोपला आहे. त्यामुळे पूर्ण आणि खरा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलाच नाही. इतकेच नव्हे, तर आपले महान ग्रंथ रामायण, महाभारत हे विद्यार्थ्यांना शिकवले गेले असते; तरी त्यातील स्थानांच्या संदर्भावरून त्यांना आपल्या प्राचीन भारताची, संस्कृतीची, वारशाची, इतिहासाची माहिती मिळाली असती. परंतु आपल्याकडे असलेल्या सोन्यासारख्या इतिहासाला झाकून ठेवून दुसऱ्यांच्या इतिहासाचा उदो उदो केल्याने वरील तरुणाचा जो संभ्रम झाला, तसाच तो इतरांचाही होणार हे निर्विवाद सत्य आहे.

शालेय विद्यार्थ्यांना भारताचा इतिहास अभ्यासासाठी आहे, पण त्यात भारताचा पूर्ण इतिहास नसल्याने अपुरा इतिहासच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे, ही मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल. आपल्या इतिहास विषयातील अपुरेपणामुळे, आजच्या तरुणांना भारताची फाळणी होऊन पाकिस्तान बाहेर पडला हेच माहिती आहे, पण या भारताचे एकोणीस वेळा तुकडे केले गेले याचा मात्र या तरुणांना मागमूसदेखील नसावा याचीच खंत वाटते.

जे विद्यार्थी इतिहासात एम.ए. करू इच्छितात, त्यांनादेखील या भारताचा संपूर्ण इतिहास अभ्यासासाठी नाही. अकरावी-बारावीच्या पुस्तकात भारताच्या स्वातंत्र्याची

कहाणी आली; पण ती इतकी थोडक्यात आटोपती घेतली की, विद्यार्थ्यांना भारताच्या स्वातंत्र्याचीच कहाणी नीट कळत नाहीये तिथे प्राचीन भारताच्या इतिहासाची कहाणी कधी कळणार? अपुऱ्या इतिहासाच्या अभ्यासाने विद्यार्थी आपले चुकीचे मत तयार करतो. याच अपुऱ्या माहितीवर काही लोक बेंबीच्या देठापासून ओरडून-ओरडून चुकीच्या पद्धतीने समाजातील लोकांचे ब्रेनवॉश करतात. त्यांच्या सततच्या सांगण्यामुळे लोकांना तो अपुरा इतिहासच खरा वाटू लागतो. यामुळे आज भारताचाच काय पण जगाचाही संपूर्ण इतिहास समजणे दुरपास्त झाले आहे. कित्येक देशांमध्ये राजकारणी मंडळीदेखील इतिहास लेखनात इतका हस्तक्षेप करतात की, त्यामुळे पूर्ण आणि खरा इतिहास विद्यार्थी आणि सामान्य जनतेपर्यंत पोहोचतच नाही. आता हेच पाहा ना... भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी हौतात्म्य पत्कारले, अनेकांनी आपले सर्वस्व पणाला लावले. वि. दा. सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, बटुकेश्वरदत्त, लोकमान्य टिळक या थोर नेत्यांनी भारत स्वतंत्र होण्यासाठी घेतलेली मेहनत, केलेले कार्य अद्वितीय आहे. पण राजकारणी लोकांच्या हस्तक्षेपामुळे या थोर नेत्यांविषयीची माहिती अभ्यासात इतकी कमी आहे की, इतिहासाच्या अभ्यासातून हे सगळे हद्दपार झाल्यातच जमा आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या दिशाहीन झालेल्या समाजाला दिशा देण्याचे महान कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवनचरित्र, त्यांचे कार्य आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी, मार्गदर्शक ठरू शकते. म्हणूनच अशा महामानवाच्या चरित्राचे, कार्याचे अखंड पुस्तकच इतिहासाच्या अभ्यासक्रमात अभ्यासाला हवे होते. पण दुर्दैवाने इतिहासाच्या पुस्तकांमध्ये या महामानवालादेखील थोडीशीच जागा मिळावी याचे वाईट वाटते. इतिहास विषयातील अपुरेपणामुळे फुले-शाहू-आंबेडकर यांची चळवळ, त्यांचे कार्य हे विद्यार्थ्यांना समजत नाही. याच्यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते असू शकते?

खरं तर इतिहास लेखनात पूर्वग्रह दूषितपणा नसावा. राग, लोभ, द्वेष, मत्सर या भावनांना दूर लोटून इतिहास लेखन होणे आवश्यक आहे. पण आपल्याकडे इतिहास लेखनात या सर्व भावनांचा उद्रेक झाल्याचा स्पष्ट दिसतो. एखाद्या धर्माच्या लोकांवरील राग काढण्यासाठी त्यांच्यातील नेत्यांनी केलेली महान कार्ये सामान्यांना समजणार नाहीत याची काळजी घेत इतिहासाचा अभ्यासक्रम तयार केला जातो. यामुळेच पूर्ण इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही.

अपुऱ्या इतिहासाच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांपर्यंत आणि पर्यायाने समाजासमोर खरा आणि पूर्ण इतिहास पोहोचत नाही. जर विद्यार्थ्यांपर्यंत पूर्ण इतिहास पोहोचला नाही, तर पूर्वी नेमके काय घडले व त्या घटनांचा सामना करताना आपल्या पूर्वजांचे काय बरोबर होते? काय चुकले? हे त्यांना समजण्यासाठी काहीच मार्ग शिल्लक राहत नाही. अपुऱ्या इतिहासाच्या अभ्यासाने भावी पिढीला इतिहासातील त्या घटनेचे मर्म कळत नाही. समाजातील तरुण पिढी खऱ्या इतिहासापासून वंचित राहते. दोन समाजांतील तेढ सुटण्याऐवजी वाढतच जाते. याची परिणती दुर्दैवी घटनांमध्ये होते. आपणच आपला बहूमूल्य ठेवा नव्या पिढीपासून लपवत आहोत. इतिहासातील सत्यता कळण्यासाठी, आपल्या इतिहासावर प्रेम करण्यासाठी, संस्कृती आणि वारसा जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांना पूर्ण इतिहास कळणे आवश्यक आहे.

भ्रमणध्वनी – ८१०८१८३५२२